साहिल लहू कोळी, वरेडी.

□ मीनाक्षी शेषाद्री व रेखाचा पहिला चित्रपट कोणता?

– मीनाक्षी शेषाद्रीचा पहिला चित्रपट *पेंटरबाबू*. रेखाचा पहिला चित्रपट *सावन भादो*.

श्वेता वासुदेव कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ मनीषा कोईरालाचा पहिला चित्रपट कोणता? नायक कोण?

– पहिला चित्रपट *सौदागर*. नायक विवेक मुशरन.

स्वाती कातकर, बोरिवली.

□ जया भादुरीचा पहिला चित्रपट कोणता? नायक व दिग्दर्शक कोण?

– पहिला चित्रपट *गुड्डी*. नायक सामित भांजा, दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी.

भानुदास पोशा कोळी, वरेडी.

□ हिंदीतून मराठीत डब झालेले चित्रपट कोणकोणते?

– हिंदी चित्रपट मराठी प्रेक्षक पाहत असल्यामुळे ते मराठीत डब होत नाहीत. पण हिंदीपासून प्रेरणा घेऊन अनेक चित्रपट आजवर स्वतंत्रपणे मराठीत निर्माण झाले आहेत. वानगीदाखल ही काही नावे *जन्माची गाठ* १९४९ (*आरसी*), *रंगपंचमी* १९६१ (*अनहोनी*), *सोनियाची पाऊले* १९६२ (*शादी*), *अपराध* १९६८ (*एक साल*), *चोरावर मोर* १९८० (*सीता और गीता*), *नाव मोठं लक्षण खोटं* १९७७ (*इंतकाम*), *अरे संसार संसार* १९८१ (*मदर इंडिया*), *धुमधडाका* १९८५ (*प्यार किये जा*), *खरा वारसदार* १९८६ (*स्वयंसिद्धा*), *अशी ही बनवाबनवी* १९८८ (*बीवी और मकान*), *फेकाफेकी* १९८९ (*आज की ताजा खबर*) आदि.

खुशबू हडकर, मुलुंड.

□ अमिताभ बच्चन व अमजद खान यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *शोले, परवरिश, बेशर्म, मुकद्दर का सिकंदर, मिस्टर नटवरलाल, सुहाग, राम बलराम, बरसात की एक रात, कालिया, लावारिस, याराना.*

नामदेव नारायण कोळी, वरेडी.

□ संजय दत्त व माधुरी दीक्षित यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *थानेदार, साजन, खलनायक.*

विकी रामदास कोक, अंतोरे, पेण.

□ वैजयंतीमालाचा पहिला व शेवटचा चित्रपट कोणता?

– पहिला चित्रपट *बहार*, शेवटचा चित्रपट *गंवार*.

अशोक परशुराम परब, ठाणे.

□ फिल्मफेअर ॲवॉर्ड केव्हा सुरू झाले?

– १९५३ साली.

निर्मला ओंबाळकर, देवगड.

□ राजकुमार व सुनील दत्त यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केलीय?



वक्तमध्ये सुनील दत्त व राजकुमार

– *वक्त, हमराज, छत्तीस घंटे* या चित्रपटात. *मदर इंडियात* ते होते. पण या चित्रपटात राजकुमारच्या भूमिकेच्या मृत्यूनंतर सुनील दत्तची पडद्यावर एन्ट्री होत होती. यामुळे या दोघांचा आमने सामने एकही सीन नव्हता.

गणेश गुरव, कासार्डे.

□ दिलीपकुमारला सर्वश्रेष्ठ अभिनेत्याचे फिल्मफेअर पारितोषिक कोणकोणत्या चित्रपटासाठी मिळाले?

– *दाग* (१९५३), *आजाद* (१९५५), *देवदास* (१९५६), *नया दौर* (१९५७), *कोहिनूर* (१९६०), *लीडर* (१९६४), *राम और श्याम* (१९६७), *शक्ती* (१९८३).

ज्ञानेश्वर महाडीक, महाड.

□ लता मंगेशकरना कोणकोणत्या चित्रपटासाठी सर्वश्रेष्ठ पार्श्वगायिकेचे फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळाले?

– *मधुमती* (१९५८), *बीस साल बाद* (१९६०), *खानदान* (१९६५), *जीने की राह* (१९६९). *जीने की राह*नंतर यापुढे पारितोषिकासाठी आपल्या नावाचा विचार केला जाऊ नये, असे फिल्मफेअरवाल्यांना कळवून हे पारितोषिक स्वीकारणे त्यांनी बंद केलं.

निमा सावंत, डांबरे.

□ सुहास जोशी यांना कोणत्या चित्रपटासाठी महाराष्ट्र सरकारचं सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचं पारितोषिक मिळालं?

– *तू तिथं मी.*

रत्नप्रभा परब, दादर.

□ भावना या अभिनेत्रीचे खरे नाव काय? तिने कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?

– भावनाचं खरं नाव सुमन ताटे. याच नावाने तिने *चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे* या चित्रपटात भूमिका केली होती. भावना या नावाने तिने *मंगळसुत्र, अधिकार, पाठलाग* यासारख्या काही चित्रपटात भूमिका केल्या.

सुदेश जोशी, कल्याण.

□ मन्ना डे यांनी कोणत्या चित्रपटात सर्वात प्रथम गाणे गायले?

– १९४२च्या *तमन्ना* या चित्रपटात.

निलेश वाघरे, कुडाळ.

□ हेमंतकुमारने संगीत दिलेला मराठी चित्रपट कोणता?

– *नायकिणीचा सज्जा.*

कृ. प. काणे, वाशी-नवी मुंबई.

□ कपूर या आडनावाचे कोणकोणते कलाकार आजवर चित्रपटात आले आहेत?

– पृथ्वीराज कपूर, त्रिलोक कपूर, कमल कपूर, राज कपूर, शम्मी कपूर, शशी कपूर, रणधीर कपूर, ऋषी कपूर, राजीव कपूर, कुणाल कपूर, करिश्मा कपूर, करिना कपूर, संजना कपूर, भरत कपूर, दिग्दर्शक केदार कपूर त्यांची अभिनेत्री कन्या मधु कपूर, शशी कपूरची पत्नी जेनीफर कपूर, अनिल कपूर, त्याचा भाऊ संजय कपूर, त्या दोघांचा निर्माता भाऊ बोनी कपूर आणि या तीन कपूरांचे वडील सुरींदर कपूर, शेखर कपूर, गोगा कपूर, जितेंद्र (खर नाव रवी कपूर), पार्श्वगायक महेंद्र कपूर, त्याचा मुलगा रोहन कपूर, अन्नू कपूर, करण कपूर, शक्ती कपूर, पंकज कपूर, अभिनेता विक्रम कपूर त्यांची कन्या पार्श्वगायिका मीना कपूर. ●